**इयत्ता : बारावी [ STD. XII] : मराठी (109) [ Marathi ]**

**द्वितीय सत्र नमुना उत्तर-पत्रिका : 22 - 23 [Sample paper : 2022 - 23 ]**

**वेळ : 3 तास** **एकूण गुण : 80**

**सर्वसाधारण सूचना :**

1. **या प्रश्नपत्रिकेत - अ,ब, क, ड - असे चार विभाग आहेत.**
2. **सर्व विभाग आवश्यक आहेत.**
3. **यथाशक्य सर्व विभागाची उत्तरे क्रमाने यावीत.**
4. **एकाच विभागातील सर्व प्रश्नांची उत्तरे क्रमानेच यावीत.**

## विभाग : अ : आकलन (15)

**प्रश्न 1)** :पुढील परीच्छेद लक्षपूर्वक वाचा आणि त्याआधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा .

डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम राष्ट्रपती झाल्यापासून त्यांना ............

............ ................ ............... सर्वांचे सल्ले शांतपणे ऐकून घेतले होते.

**अ)** खालील प्रश्नांची उत्तरे योग्य पर्याय निवडून लिहा. **(3 x 1= 3)**

I) सरकारी संस्था व स्थानिक संस्थांनी कलामांना कशासाठी विनंत्या केल्या ?

B) संस्थांना त्यांचे नाव देण्यासाठी

II) डॉ. कलामसाहेबांनी परदेश दौरा कधी केला ?

B) भारताच्या बहुतांश भागाला भेट दिल्यानंतर.

III) युरोपियन संसदेसमोर डॉ. कलाम यांनी 25 मिनिटेच बोलावे असा सचिवांचा आग्रह होता, कारण ..

C) अधिक वेळ बोलण्याने देशाचा काही फायदा नव्हता.

❖ **प्रत्येक अचूक आणि पूर्ण वाक्यातील उत्तर : 1 गुण**

**ब)** पुढील प्रश्नांची 30 / 35 शब्दांत उत्तरे लिहा . **(2 x 2=4)**

I) अधिकाराच्या जागा मिळाल्यानंतर लोक अगोदर कोणत्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करतात?

➢ नवीन पदावर नियुक्ती ... ऑफिसच्या पैशातून भ्रमंती ... अगोदर स्वत:च्या गल्ली,गाव, तालुका,जिल्हा, येथील विकासाला महत्व ... वारंवार भेटी देऊन खूप लक्ष असल्याचा भास निर्माण करणे.

II) डॉ.कलाम यांना आपल्या योजनेपासून का ढळावे लागले ?

- राष्ट्रपती एक महत्वाची व्यक्ती ... भारत देश संपूर्ण फिरल्यानंतरच बाहेर देशाचा दौरा हा निश्चय ... प्रत्येक गोष्टीचे नियोजन आवश्यक असते ... नियोजनानुसार बाहेर देशात जावे लागले ... म्हणून..

**क)** पुढीलपैकी एका प्रश्नाचे उत्तर सुमारे 40 / 45 शब्दांत लिहा. **(1 x 3=3)**

I) 'डॉ.कलाम यांच्याकडे उच्च नैतिक मूल्ये आणि व्यावसायिक शिष्टाचार होते.' असे का म्हटले आहे ?

- डॉ.कलाम यांच्याकडे उच्च नैतिक मूल्ये आणि व्यावसायिक शिष्टाचार होते .... पदाचा गैरवापर न करणे ... इतर पदाधिष्टीत लोकांच्या तुलनेत सरकारी सोयींचा कमी वापर ... स्वत: जवळच्या लोकांपेक्षा सर्वसामान्य लोकांचे प्रश्न महत्वाचे वाटणे ... देशाबद्दल वाटणारा सार्थ अभिमान ... सहकारींचा सल्ला ऐकणे ... या गुणांमुळे ....

- **सर्व आवश्यक मुद्दे, स्वत:ची भाषा, शुद्ध लेखन यानुसार प्रत्येक उत्तरसाठी योग्य गुणदान.**

**प्रश्न 2)** खालील कविता वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा.

होता डोंगरमाथ्यास पडला धोंडा भला थोरला ;

...............................................

लावण्यकृती ती वनात अजुनी आहे उभी हासत,
पुष्पेही बसलीत ती बिलगुनी पायी तिच्या खेळत !

**अ)** खालील प्रश्नांची उत्तरे दिलेल्या पर्यायामधून निवडून लिहा. **(2x1=2)**

I) धोंडा संतापून फुलांस काय म्हणाला ?

B) तुम्ही वाळून जाल.

II) शिल्पकारास त्या दगडात काय दिसले ?

A) दिव्यता

**ब)** खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 12 / 20 शब्दांत लिहा. **(3x1=3)**

I) बाळे कोणास म्हंटले आहे ?

- ➢ फुलवेलीवर बहरणाऱ्या कळ्यांना व फुलांना .....

II) धोंडा काळाठिक्कर का पडला ?

- ➢ तू दगड आहेस....तुझा काही उपयोग नाही ... असे हिणवल्यामुळे .

III) वेड्या पीराने काय केले ?

- ➢ मूर्ती बघून नाचायला लागला....फुलवेलीवरील फुले तोडून मूर्तीवर वाहिली...

❖ **प्रत्येक अचूक आणि पूर्ण वाक्यातील उत्तर : 1 गुण**

## विभाग ब (15)

**प्रश्न 3)** खालीलपैकी <u>कोणत्याही एका विषयावर</u> 300 ते 325 शब्दांत निबंध लिहा. **(1x10=10 )**

I) कोरोना पिडीताची आत्मकथा :

स्वपरिचय .... इ.स.2019-20 या काळात देशात व जगात कोरोनाचे थैमान .... कोरोना आजार .. कसा व का झाला ... कोरोना बद्दलची मनातील भीती ... डॉ. कडे तपासणी व औषधे ... कोरोनाबद्दल समज - गैरसमज ... घरात व समाजात मिळालेली वागणूक ... घरच्यांना समाजाकडून मिळालेली वागणूक ... दवाखान्यात मिळालेली सेवा .... आयुर्वेदिक औषधे ... व्यायाम व योगासनांचा फायदा .... सकारात्मक विचार कामी आले ... आजारातून सुखरूप बचावणे ...परमेश्वराचे आभार ...

II) मी पाहिलेला क्रिकेटचा सामना

आवडता खेळ क्रिकेट ...क्रिकेटचीच आवड का? .... आवडण्यासाठी एखादा प्रसंग ... खेळाविषयी माहिती (खेळाडू, दोन टीम, स्टंप, पंच, निकाल,सर्वांचे महत्व ) ... पाहिलेल्या सामन्याचे वर्णन .. खेळ सुरु असताना घडलेल्या गमतीजमती ..... विशेष सामना आवडण्याचे कारण ... .दोन्ही पक्षांच्या धावा .... घेतलेले बळी....सामना कोणी जिंकला...इत्यादी .

III) प्लास्टिक मुक्त भारत

प्लास्टिकच्या वापरास सुरुवात ... वजनाने हलके ... जवळ बाळगण्यास सोपे .... अतिउपयुक्त वस्तू म्हणून वापर .. पण .. जागतिक समस्या ... भारत देशात जास्त वापर ... प्लास्टिकच्या घातकपणाविषयी लोकांचे अज्ञान ... फायदा कमी, दुष्परिणाम जास्त .. शासनाच्या प्लास्टिक विरोधी योजना ... भविष्यकाळाचा विचार करून प्लास्टिक मुक्त भारत करणे आवश्यक. .. इत्यादी.

IV) मी मुख्यमंत्री झालो तर ...

मुख्यमंत्री होणे का सुचले या विषयी....राज्याची सद्य परिस्थिती .....दीर्घकाळ टिकणारे

सरकार नाही ... महाराष्ट्रातील मुख्य समस्या (वीज, पाणी, शेतकरी आत्महत्या, वाढते शहरीकरण, यांत्रिकीकरणामुळे लोकांच्या उपजीविकेवर परिणाम, प्रदूषण, वाढती महागाई इत्यादी..) ठोस निर्णयाची कास धरून लोकोपयोगी कामे करण्याची इच्छा. ... इ.

- ❖ प्रत्येक विषयाला अनुसरून योग्य व आकर्षक सुरवात / प्रस्तावना - - 2 गुण
- ❖ विषयाशी संबंधीत आवश्यक ते सर्व मुद्दे - - 3 गुण
- ❖ शुद्ध आणि योग्य भाषा, व सादरीकरण [ परिच्छेद इ.] - 3 गुण
- ❖ भाषा सौंदर्य [ विषयानुरूप काव्यपंक्ती, वाक्प्रचार,म्हणी इ.चा वापर.] - 2 गुण

**प्रश्न 4)** तुमच्या शाळेत झालेल्या 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' या कार्यक्रमाचे अहवाल लेखन करा. **(1x5=5)**

- ❖ **प्रस्तावना .. स्थळ, काळ, वेळ, कार्यक्रमाचे स्वरूप .. मुख्य पाहुण्यांचा संदेश .. समारोप .. इ. मुद्दे असावेत. यानुसार ..**
- ❖ **आवश्यक ते सर्व मुद्दे, योग्य भाषाशैली, शुद्ध आणि योग्य भाषा, यानुसार गुणदान.**

**किंवा**

'मोठ्या शहरातील वाढते प्रदूषण' या संबंधी एक वृत्तलेख लिहा.

- ❖ **योग्य प्रस्तावना .. विषयाचे महत्त्व ... परिणाम .. उपाय ... इ. मुद्दे.**
- ❖ **आवश्यक ते सर्व मुद्दे, योग्य भाषाशैली, शुद्ध आणि योग्य भाषा, यानुसार गुणदान**

## विभाग क : व्याकरण (25)

**प्रश्न 5)** सूचनांप्रमाणे उत्तरे लिहा.

**अ)** पुढील शब्दांसाठी दिलेल्या पर्यायापैकी अचूक समानार्थी शब्द लिहा. (कोणतेही 3) **(3x1=3)**

I) वासरमणी
C) सूर्य
II) निकड
A) गरज
III) क्रोध
B) राग
IV) सोहळा
D) उत्सव

❖ **प्रत्येक योग्य व अचूक उत्तर : 1 गुण**

**आ)** योग्य पर्याय निवडून पुढील समास ओळखा. ( कोणतेही 2) **(2x2=4)**

I) शब्दकोश

A) विभक्ती तत्पुरुष

II) पुढीलपैकी कोणते पद द्विगू समास आहे ?

B) पंचधातू

III) पुढीलपैकी कोणते पद अव्ययीभाव समास आहे ?

B) दरवर्षी

IV) गुणदोष

B) द्वंद्व समास

❖ **प्रत्येक योग्य व अचूक उत्तर : प्रत्येकी 2 गुण**

**इ)** पुढील वाक्यांचा प्रयोग ओळखा किंवा सूचनेनुसार वाक्याचा प्रयोग बदला. (कोणतेही 3)**(3x2=6)**

I) चिनी सैनिकांनी गोळीबार केला. --- कर्मणी प्रयोग

II) कर्तरी प्रयोग --- देवकी गाणे खूप सुंदर गाते.

III) कप्तानाने सैनिकांना सूचना दिल्या. ---- भावे प्रयोग.

IV) कर्मणी प्रयोग -- तिने हलकेच खिडकी उघडली.

❖ **प्रत्येक योग्य व अचूक उत्तर :प्रत्येकी 2 गुण**

**ई)** वाक्य प्रकार ओळखा किंवा सूचनेनुसार वाक्यप्रकार बदला. (कोणतेही 3) **(3 x 2 = 6)**

I)'किती मनापासून हसतात ती लहान मुलं !' - या वाक्याचे विधानार्थी वाक्य आहे .....

अ] ती लहान मुलं खूप मनापासून हसतात.

II) 'या वर्षीच्या पावसाने खूप नुकसान झाले. - या वाक्याचे प्रश्नार्थी वाक्य असेल ......

अ] या वर्षीच्या पावसाने काय कमी नुकसान झाले का ?

III) 'आपला परिसर स्वच्छ ठेवावा.' - हा वाक्यप्रकार आहे ....

क] विद्यर्थ

IV) 'ही कल्पना चांगली आहे.' - हा वाक्यप्रकार आहे .....

ड] होकारार्थी

V) 'तू नियमित सराव कर.' - हा वाक्यप्रकार आहे ......

क] आज्ञार्थ

❖ **प्रत्येक योग्य व अचूक उत्तर : प्रत्येकी 2 गुण**

**उ)** खाली दिलेल्या वाक्यातील <u>अधोरेखित शब्दसमूहाऐवजी</u> कंसातील <u>योग्य अर्थाच्या वाक्प्रचाराचा</u> <u>उपयोग करा</u>. (कोणतेही तीन) **(3 x 2 = 6)**

[वाक्प्रचार - नजर ठेवणे, दातखिळी बसणे, आभाळाकडे डोळे लावणे. दोघात सख्य नसणे. बळ लावणे. जमीनअस्मानाचे अंतर असणे. ]

I) मृग नक्षत्र सुरु होताच शेतकरी <u>आभाळाकडे डोळे लावतो.</u>

II) मुलांनी <u>आपले बळ लावले</u> अन् शेवटी ती खिडकी उघडली.

III) पश्चिमी संस्कृती आणि भारतीय संस्कृती यात <u>जमीनअस्मानाचे अंतर आहे.</u>

IV) ती अवाढव्य काळी आकृती पाहून <u>उषाकाकूची तर दातखीळ बसली</u>.

V) तात्या बँकेतून रक्कम घेऊन बाहेर पडले, परशा त्यांच्यावर <u>नजर ठेऊन होताच</u>.

❖ **प्रत्येक योग्य व अचूक उत्तर : प्रत्येकी 2 गुण**

## विभाग : ड : गद्य-पद्य पाठ आणि उपयोजित लेखन (25)

**प्रश्न 6:** आपल्या <u>गद्य-पाठांधारे</u> पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.

**अ)** योग्य पर्याय निवडून कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे लिहा. **(3 x 1 =3)**

I) 'शोध' कथेत कोणत्या नोटेचा शोध सुरु होता ?

D) पेशंट मुलीने दिलेल्या एक रुपयाच्या

II) मराठी भाषेला दातांविषयी आदर नाही.' असे लेखकाचे मत आहे, कारण .....

C) मराठीत दातांसंबंधी मंगल भावना व्यक्त करणारा एकही शब्दप्रयोग नाही.

III) आनंद जितका सहजपणे घ्याल तितका तो .......

C) सहजपणे मिळतो.

❖ **प्रत्येक योग्य व अचूक उत्तर : प्रत्येकी 1 गुण**

**प्रश्न 6:ब)** पुढीलपैकी <u>कोणत्याही दोन</u> प्रश्नांची प्रत्येकी सुमारे <u>35/40 शब्दांत</u> उत्तरे लिहा. **(2 x 2= 4)**

I) रेशीमबंध पाठात उत्तररात्रीच्या आगमनाची वैशिष्ट्ये -

रेशीमबंध' एक ललित लेख .. लेखक यू.म.पठाण. ]... निसर्गाशी असणारे सुंदर नाते ......

i] रात्रीची नीरव शांतता .. जग साखरझोपेत .. उत्तररात्र मुलायम पावलांनी हळुवार .. अलगद ... त्यांची स्पंदने उमटतात ..

ii] पाखरांना जाग .. कुजबुज .. पहाट व पाखरे यांचा संवाद .. पाखरांच्या आवाजाने सायली, चाफा, बोगनवेल यांना जाग .. असा हा अनोखा, नाजूक, तरल, आल्हाददायक अनुभव.

II) वाहनांचा वेग वाढल्याने शरीरावर दुष्परिणाम ---

लेखक प्रा. शिवाजीराव भोसले ... अतिवेगाच्या आहारी गेलेल्यांची मनोविकृती स्पष्ट केली ...

i] वेळ व अंतर वाचवण्यासाठी वाहन .. चालत जाऊन कामे करण्याने शरीराची हालचाल .. अतिवेगाने अपघाताची भीती .. मनावर ताण ..

ii] अति वेगाने कमरेची .. पाठीची दुखणी .. अनावश्यक स्पंदने .. डोळ्यांवर ताण.. हे दुष्परिणाम ..

III) लेखक शिवराज गोर्ले यांनी खऱ्या आनंदाची कोणती लक्षणे सांगितली आहेत ?

आयुष्य .. आनंदाचा उत्सव' एक प्रबोधन लेख. लेखक शिवराज गोर्ले.

i] मनावरचे दडपण, ताण नाहीसे .. मन पिसासारखे हलके होते.

ii] मनातील इर्षा, मत्सर, राग - द्वेष नाहीसे होऊन मन प्रसन्न ..ही खऱ्या आनंदाची लक्षणे ..

IV) अनुचा घर सोडण्यामागचा विचार 'शोध' या कथेच्या आधारे थोडक्यात लिहा.

सुप्रसिद्ध लेखक व. पु. काळे यांची वैशिष्ट्यपूर्ण कथा .. कथानायिका अनु पाच वर्षे तरी स्वतंत्र राहण्याचा विचार करते ..कारण ..

i] तिच्या मते प्रत्येकजण स्वतंत्र मेंदू घेऊन जन्माला .. तसे स्वतंत्र अस्तित्व जपण्याचा प्रयत्नही आवश्यक

ii] स्व:ताच्या स्वतंत्र नजरेने जगातील घटनांचे मूल्यमापन करता यावे अशी नजर तयार करता यावी यासाठी ...

- **पाठाचा योग्य संदर्भ [ पाठाचे नाव, लेखक, थोडक्यात पाठची मध्यवर्ती कल्पना,]**
- **आवश्यक ते सर्व मुद्दे आणि स्वतःची भाषा, शुद्धलेखन यानुसार प्रत्येकी 2 पैकी गुण**

**प्रश्न 6:क)** पुढीलपैकी कोणत्याही <u>दोन प्रश्नांची उत्तरे</u> सुमारे 80 /90 शब्दांत लिहा. **(2 x 4 = 8)**

I) सौंदर्य जसं पाहणाऱ्याच्या दृष्टीत तसं आनंद घेणाऱ्याच्या वृत्तीत असतो.' असे का म्हटले आहे ?

'आयुष्य .. आनंदाचा उत्सव' एक प्रबोधन लेख. लेखक शिवराज गोर्ले. आनंद नेमका कशात आणि तो कसा अनुभवायचा याबाबत मार्मिक विवेचन.

i] प्रत्येकाची आनंद मानण्याची आणि तो मिळवण्याचा मार्ग वेगवेगळा .. आनंदाच्या अनेक तऱ्हा...

ii] नाणी तिकिटे जमवणे, सिनेमा पाहणे ..इ. अनेक आनंदाचे मार्ग ... व्यक्ती तितक्या प्रकृती'

iii] हेलक्षात घेऊन या विविधतेची बूज राखली ..तर समस्या कमी .. समाजजीवन विविधतेच्या रंगाने बहरेल ... म्हणून ..

II) आरंभी माणसे वाहनांवर मग वाहने माणसांवर स्वार होतात असे का म्हटले आहे ?

'वेगवशता' .. एक माहितीपूर्ण लेख... लेखक प्रा. शिवाजीराव भोसले ... अतिवेगाच्या आहारी गेलेल्यांची मनोविकृती स्पष्ट केली ...

i] अंतर व वेळ कमी करण्यासाठी गाडी आवश्यक .. लोक सुरुवातीला गाडी जपून ... पुढे प्रत्येक छोट्या कामासाठीही ...

ii] नंतर मौजमजा म्हणून वापर ... पूर्णपणे गाडीवर अवलंबून ...

iii] नंतर सिगारेटसारखे व्यसनच.. मनाबर ताबा रहात नाही .. गाडीचे गुलाम .. वापराबाबत तारतम्य नाही .. म्हणून म्हटले आहे ....

III) दातदुखीमुळे लेखकाचे आध्यात्मिक तत्त्वचिंतन ----

लेखक वसंत सबनीस यांचा ललित विनोदी लेख 'दंतकथा' ... दातदुखीची केविलवाणी अवस्था नर्म विनोदी शैलीत ....

i] भारतीय आध्यात्मिक विचार .. 'ब्रह्म एक सत्य, संसार माया, असार .. मिथ्या .. इ.

ii] दात दुखतो तेव्हा लक्ष त्यावर एकाग्र .. जग मिथ्या ही जाणीव .. दुसऱ्या कामात लक्ष नाही .. सारा संसार असार ..

iii] खाण्यापिण्याच्या इच्छा-वासना नष्ट .. शेंगदाणे दगडाप्रमाणे बेचव .. बायको- मुलं- केवळ भास ..

iv] दाताचा ठणका ब्रह्मांड दर्शन करवतो .. सारे ब्रह्मांड मिथ्या, एक दातच सत्य असे वाटते.. अशा प्रकारे.

IV) 'रेशीमबंध' या शीर्षकाची समर्पकता --

रेशीमबंध' एक ललित लेख .. लेखक यू.म.पठाण.... उत्तररात्रीच्या समयाचे चैतन्यमय वर्णन .

i] पहाटे पानांपानांतून वाहणारी हिरवाई .. मंद सुवास .. पाखरं, झाडेवेलीं यांच्या गप्पागोष्टी .. त्यांचे आपसातील बंध .. त्यांचा तहानलेला जीव शांत केला की जणू रुसवा सोडतात ..

ii] हसरी फुले .. सुगंधाची पखरण ... त्यांचा मोह .. जुनं नातं असल्याचं जाणवतं .. तुकोबाच्या 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी'चा मनाला अर्थ समजतो व जाणवतो ..

एक आदिम बंध .. युगायुगाचं नातं .. न तुटणारे .. म्हणून 'रेशीमबंध' .

- **याप्रमाणे पाठचा संदर्भ व उत्तराचा योग्य समारोप. आणि**
- **आवश्यक ते सर्व मुद्दे, योग्य स्वतःची भाषा, शुद्ध लेखन, या सर्वा आधारे प्रत्येकी 4 पैकी गुण.**

**प्रश्न 7 :** <u>पद्य पाठांच्या</u> आधारे पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.

**अ)** योग्य पर्याय निवडून कोणतीही दोन उत्तरे लिहा. **(2x1=2)**

I) कवी बोरकरांनी वर्णिलेली '...कोमल पाचूची शेते' म्हणजे .....

D) शेतातील पिके

II) सुरेश भट लिखित 'रंग माझा वेगळा' ही एक .....

B) गज़ल आहे.

❖ **प्रत्येक योग्य व अचूक उत्तर : प्रत्येकी 1गुण**

**ब)** कोणत्याही <u>दोन प्रश्नांची</u> उत्तरे सुमारे 35/40 शब्दांत लिहा. **(2x2 =4)**

I) कवयित्री हिरा बनसोडे यांना स्त्रीमध्ये जाणवलेले बदल ----

'आरशातील स्त्री' हिरा बनसोडे यांची कविता .... स्त्रीच्या स्थित्यंतराचे वर्णन ... आरशातील 'ती' ... आजच्या 'ती'चेच पूर्व रूप .. ते रूप बदल जाणवून देते .. पूर्वीचे आपले स्वप्नील, ध्येयवेडे रूप .. आज मात्र संसारातील जबाबदाऱ्या .. पारंपारिक स्त्रीत्वाचे ओझे यात आपला स्वतःचा आनंद विसरली ... स्थितप्रज्ञ झाली .. अशा रितीने 'ती'च्या' स्थित्यंतराचे वर्णन ...

II) 'रोज मातीत' या कवितेतील शेतकरी स्त्री कोणकोणती कामे करते ?

कवयित्री कल्पना दुधाळ यांची कविता ' रोज मातीत' .. शेतकरी स्त्रीच्या जीवनाचे वर्णन ..सरी वाफ्यात कांदे, ऊस, लावते. काळ्या आईला हिरवं गोंदते. खोल विहिरीचं पाणी शेंदते ... झेंडू तोडते .. त्याच्या माळा घरादाराला लावते... घर सजवते .. अशी संसारासाठी उन्हातान्हात सतत राबते.

III) कवी बा. भ. बोरकर आषाढ घनांना थांबायला सांगत आहे कारण ..

निसर्ग कवी बा. भ. बोरकर .. ' रे थांब जरा आषाढ घना'.. आषाढातील निसर्गाचे रम्य वर्णन .हिरवीगार शेते, इंद्रनीळ वेळू, केवडा चाफा,जाई जुई .. ही सर्व आषाढातील पावसाचीच दया .. घन थांबला तर आकाशातून सोनेरी किरणे .. मग हे निसर्ग सौंदर्य अनुभवता येईल... म्हणून ..

IV) 'रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा' असे कवी म्हणतात ---

सुरेश भट यांची गजल ' रंग माझा वेगळा' कवी सर्व रंगात मिसळून .. सर्व सामाजिक, भावनिक नात्यात गुंततात ... तरीही आपले व्यक्तिमत्त्व वेगळे आहे .. अनोखे आहे.... असे सांगायचे आहे म्हणून ..

❖ **कवितेचा योग्य संदर्भ [कवितेचे नाव, कवी, थोडक्यात मध्यवर्ती कल्पना,]**

❖ **आवश्यक ते सर्व मुद्दे आणि स्वतःची भाषा, शुद्धलेखन यानुसार प्रत्येकी 2 पैकी गुण**

**प्रश्न 7 क)** पुढीलपैकी <u>एका प्रश्नाचे</u> उत्तर सुमारे 70/75 शब्दांत लिहा. **(1x4= 4)**

I) संदर्भासह अर्थ स्पष्ट करा. -

उघड गगन ....... कोवळ्या नव्या हळदुव्या उन्हा

निसर्ग कवी बा. भ. बोरकर .. ' रे थांब जरा आषाढ घना'.. आषाढातील निसर्गाचे रम्य वर्णन .... आषाढ घनाच्या दयेने निसर्गात विविध प्रकारचे सौंदर्य .... पाचूसारखी शेते, गंधित केवडा, चाफा, लाजरी जाईजुई ... पाण्यातील मासोळ्या इ. निसर्गाची रम्य रूपे .. पण संतत पाऊसधारांनी ते अनुभवता येत नाही .... या घनाने थांबावे, सूर्याचे घर मोकळे करावे ... सोनेरी ऊन येईल ... आषाढ मेघांचीच ही जादू .... निसर्गावर ती सोनेरी किरणे वाहू देत.

कवितेत निसर्ग वर्णनात मानवी भावभावना ... यामुळे वातावरण चैतन्यमय व मधुर.

II) पुढील काव्यपंक्तीचा संदर्भासह आशय स्पष्ट करा.

'नाही बेणं ग मन दाबते, बाई दाबते
कांड्याकांड्यानी संसार सांधते बाई सांधते

कवयित्री कल्पना दुधाळ यांची कविता ' रोज मातीत' .. शेतकरी स्त्रीच्या कष्टमय जीवनाचे वर्णन ..

शेतकरी रात्रंदिवस काम ... आपल्या संसारासाठी हे कष्ट ..शेतात बियाणं दाबते .. तसे मनही दाबते .. मनातील इच्छा दाबते. उसाच्या कांड्याकांड्या जोडत सरीत लावते ... तसा आपला संसार सांधते. .. आपले घर - संसार यापुढे आपल्या इच्छा सुख यांना महत्त्व देत नाही.

' मन दाबते', 'संसार सांधते' शब्द योजनेमुळे या स्त्रीचे समर्पण जाणवते.

- **यापप्रमाणे कवितेचा संदर्भ व उत्तराचा योग्य समारोप. <u>आणि</u>**
- **आवश्यक ते सर्व मुद्दे, योग्य स्वतःची भाषा, शुद्ध लेखन, या सर्वा आधारे प्रत्येकी 4 पैकी गुण**

******************